ISBN -978-93-84309-11-4

SAVITRIBAI PHULE
PUNE UNIVERSITY, PUNE

NAAC Accreditation'A' Grade

Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's

# Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

**National Seminar on**

# Status of Judicial Activism in India

Editor -In-Chief
**Prof. Rahul Pandit**

Principal
**Dr. Bhaskar Shelke**




Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

# National Seminar on

# Status of Judicial Activism in India

## *organized by*
## *Department of Political Science*

Date : 12 th & 13 th February 2016.

**Editor-in-cheif**
**Prof. Rahul B. Pandit**
**Head of the Department,**
Department of Political Science

**Co-Editor**
**Prof. A. S. Patil**
Department of Political Science

**Co-Editor**
**Prof. V.V. Rankhamb**
Department of Political Science

**Publisher**
**Principal**
**Dr. Bhaskar Shelke**
**Shri Shiv Chhatrapati College**
*Bodkenagar, Junnar (Pune)*

**© Publisher**

**Publication**
**Shabdshri Publication, Junnar**

(The Editor, Editorial Board & Publisher assume no responsibility for statements and opinions expressed by the authors in this souvenir Abstract)

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| 38 | भारतीय न्यायव्यवस्थेतील कौटुंबिक न्यायालयाची भूमिका | प्रा. धिरज भिमशा शाखापुरे . | १३२-१३४ |
| 39 | न्यायालयीन स्वातंत्र्य आणि भारतीय संसद | प्रा. हारगे महादेव माणिकराव | 135.137 |
| 40 | न्यायालयीन कार्यपध्दतीत मानसशास्त्रीय संकल्पनांचे उपयोजन | प्रा. खिलारे संदीप सिताराम | 137.139 |
| 41 | जनहित याचिका व न्यायालयीन भूमिका | प्रा. शरद मनसुख | 140.141 |
| 42 | लोकशाही सशक्तीकरणासाठी न्यायालयीन सक्रियतेची भूमिका | प्रमोद भगवानराव जाधव | 142.145 |
| 43 | मानवीहक्कांचे संरक्षण व न्यायालयीन सक्रीयता | प्रा. एकनाथ वाजगे | 146.148 |
| 44 | भारतीय राज्यघटना व न्यायालयीन सकीयता | श्री. सचिन नागोराव कसबे | 149.151 |
| 45 | भारतीय न्यायालयीन सकीयता एक दृष्टीक्षेप | कुचेकर एच. एस. | 152.154 |
| 46 | न्यायालयीन सक्रियेतेच्या भूमिकेमुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची कोंडी? | प्रा. राजेंद्र भोईवार | 155-157 |
| 47 | न्यायपालिकेची सक्रीयता | प्रा. चंदन गणेशराज सोनाळे | 158.159 |
| 48 | न्यायालयीन सक्रियता : कारणे आणि उपाय | प्रा. डॉ. विलास आघाव<br>प्रा. डॉ. सुधाकर भालेराव | 160.162 |
| 49 | **केशवानंद भारती खटला** | **प्रा.राहुल पंडित विशाल रणखांब** | **१६३-१६४** |
| 50 | भारतातील न्यायालयीन कृतिशीलता | डॉ. बेग रेहानाआरा इस्माईल | 165.168 |
| 51 | मानवी हक्काचे संरक्षण आणि न्यायसंस्थेची भुमिका | प्रा.साळवे गौतम गणपती | 169.172 |
| 52 | जनहित याचिका :सामाजिक न्यायाची संकल्पना | प्रा. मिरकुटे ई.जी.<br>डॉ. आर . डि. शिंदे | 173.174 |
| 53 | जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रीयता | प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव | 175.176 |
| 54 | संसद, न्यायालये आणि संविधान | प्रा. माधव चोले | 177.179 |
| 55 | भारतातील न्यायालयीन सक्रियता : एक अभ्यास | प्रा. काटकांबळे ना. तुकाराम | 180.185 |
| 56 | राष्टीय एकातमतेत आणि न्यायववसथेत भारतीय राज्य घटनेची भूमिका | डॉ. प्रभाकर जगताप | 186.188 |
| 57 | डॉ. बी आर. आंबेडकर आणि न्यायपालिका | मकरंद रामराव गिरी | 189.192 |
| 58 | मानवी संरक्षणात्मक कायदे आणि न्यायालयाची भूमिका | प्रा. एल.एन.कुमारे | 193.195 |
| 59 | मानवी हक्क आणि न्यायव्यवस्था | बबन गोविंद राठोड | 196.197 |
| 60 | जनहित याचिकेमध्ये न्यायालयाची भूमिका | चौधरी प्रदीप विनायक | 198.200 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : ग्रामीण विकास आणि न्यायविषयक दृष्टिकोन | कमले हणमंत विठ्ठलराव | 201.205 |
| 62 | भारतीय राज्यघटनेच्या संरक्षणामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाची भूमिका | पटेकर संजय कारभारी | 206.208 |
| 63 | न्यायालयीन सक्रीयता आणि भारतीय लोकशाही | व्हि. एस. संबेटवाड | 209.210 |
| 64 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे न्यायव्यवस्थे विषयक विचार | कढरे चंद्रकांत सिध्दार्थ | 211.212 |


Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

# भारतीय राज्यघटना व न्यायालयीन सक्रीयता

**श्री. सचिन नागोराव कसबे**
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,
श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर

## प्रस्तावना :–

भारतीय संसद तत्वतः सार्वभौम असली तरी तिचे सर्वश्रेश्ठत्व संविधानाने प्रदान केलेल्या अधिकार कक्षेतच मर्यादित आहे. त्यामुळे संसदेला आपली कायदेविशयक सत्ता घटनेच्या चौकटीतच वापरावी लागते. त्याशिवाय सर्वोच्च न्यायालयास प्राप्त झालेल्या घटनादत्त अधिकारानुसार संसदेची अधिकारकक्षा नियंत्रीत झाली आहे. सामाजीक व आर्थिक अधिकारांचे 'घटनात्मकीकरण' (Constitutionalising) करण्याचा प्रक्रियेत भारतीय न्यायशाखेचा महत्वाचा कार्यभाग हा आहे की न्यायशाखेने 'मूलभूत अधिकार' (Fundamental Rights) व राज्याची धोरणेविशयक नीतिनिर्देशक तत्वे (Directive Principles of State Policy ) यात संयोग आणि एकत्रीकरण भारतीय न्यायशाखेने घडवून ही बाब राज्याची नीतिनिर्देशकतत्वे ही, मूलभूत अधिकाराचा परिणाम घडवून आणण्याचे एक महत्वाचे माध्यम आहे या नात्याने ती नीतिनिर्देशक तत्वे साध्य करणे महत्वाचे आहे.

संविधानातील कलम 137 अंतर्गत प्राप्त झालेल्या न्यायीक पुनर्विलोकन (Judicial Review) अधिकारानुसार संसदेची कायदे करण्याची सत्ता नियंत्रित आहे. मर्यादीत सत्ता विभाजन या तत्वांचा अवलंब करून सत्ता संतुलन व सहयोग राखण्याचा रास्त प्रयत्न संविधानकर्त्यांनी म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला आहे. तेव्हा या पार्श्वभूमीवर संसद, मंत्रिमंडळ व न्यायपालिका यांच्यातील परस्परसंबंध श्रेष्ठ –कनिष्ठ या तत्वार आधारित नसून तिन्ही संस्था एकमेकांना पूरक असेच अधिकार वापरावेत हीच अपेक्षा होती. संसदेचे स्थान व सत्ता लक्षात घेता हे स्पश्ट होते की, संसदेने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत ( अर्थात संविधानांतर्गत ) न्यायालयास हस्तक्षेप करता येत नाही. मात्र संसदेने पास केलेल्या घटनात्मक व सर्वसामान्य कायद्याची वैधता तपासून पहाण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास राज्यघटनेने प्रदान केलेला आहे. कायद्याने प्रस्थापित प्रक्रिया या तत्वानुसार संसदेने केलेला कायदा न्यायालय घटनाबाहय म्हणून घोशित करू शकते. याचाच अर्थ असा की, संबंधीत कायदा संविधानातील तरतुदींशी सुसंगत आहे की नाही एवढेच पडताळून पहाण्याची सत्ता न्यायपालिकेला देण्यात आलेली आहे.

## भारतीय राज्यघटना व तिचे सार्वभौमत्व :–

संसद संविधाननिर्मित असल्यामुळे संविधानापेक्षा श्रेश्ठ नाही. संवैधानिक प्रक्रियेद्वारेच तिला आपली कायदे निर्मितीची सत्ता वापरावी लागते. त्यामुळे इंग्लडच्या पार्लमेन्टप्रमाणे ती सर्वश्रेश्ठ किंवा सार्वभौम बनू शकली नाही. लिखित व ताठर राज्यघटना, या तत्वामुळे संसद स्वयंभू बनू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. एवढेच नाही तर संविधान संशोधनाचा अधिकारसुध्दा संसदेला अमर्यादपणे वापरता येत नाही. हे सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी सिध्द केलेले आहे. राज्यघटनेतील कलम 368 नुसार व ठरवून दिलेल्या पध्दतीने संसदेला आपला घटनादुरूस्तीचा अधिकार वापरता येतो. विशेश म्हणजे कलम 368 ची व्याप्ती व मर्यादा स्पश्ट करण्याची अंतिम सत्ता सर्वोच्च न्यायालयाकडे असल्यामुळे संसदेचा घटनादुरूस्ती अधिकारही मर्यादितच ठरतो. उदाहरण दयाचेच झाल्यास 1971 साली केलेली पंचविसावी घटनादुरूस्ती सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाहय म्हणून घोशित केली होती. याचाच अर्थ असा की, कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेत संसद शक्तिमान असली तरी तिचे सर्वश्रेश्ठतव राज्यघटनेच्या अंतर्गतच आहे. तर दुसऱ्या बाजूने राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राची सविस्तर चर्चा केलेली असल्यामुळे व राज्यघटनेचा संरक्षक म्हणून



Scanned by CamScanner

सत्ता प्रदान केली असल्यामुळे संसदेच्या अधिकारकक्षा सीमित झाल्या आहेत.

**भारतीय राज्यघटनेच्या पायाभूत संरचनेबाबत न्यायालयीन भूमिका :—**

संसद घटनेच्या कोणत्याही भागात दुरूस्ती करण्यास अधिकारपात्र असली तरी राज्यघटनेची पायाभूत संरचना (Basic Structure) मोडण्याचा किंवा ओलांडण्याचा तिला मुळीच अधिकार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती खटल्याचा निर्णय देतांना स्पश्ट केले होते. तेव्हापासून 'पायाभूत संरचनेचा' नवाच वाद (घटनात्मक दुरूस्तीची) अधिकच अस्पश्ट झाली. घटनेला 'पायाभूत संरचना' असते काय? इथपासून तर संसदेला राज्यघटनेत कोणत्याही स्वरूपाचा व कोणत्याही भागात बदल करण्याचा अंतिम अधिकार आहे इथपर्यंत वादग्रस्त अशा चर्चेला सुरूवात झाली. जी आजपर्यंतही अधूनमधून डोके व काढतांना दिसते.

सन 1950 साली करण्यात आलेल्या पहिल्याच घटनादुरूस्तीपासून हा घटनात्मक वाद सुरू झाला जो आजपर्यंत वेगवेगळी वळण घेत कायम आहे. संविधानातील दुरूस्ती करण्याची तरतूद असलेले 368 वे कलम न्यायालयीन क्षेत्रात वादग्रस्त ठरले. पहिल्या घटनादुरूस्तीने मूलभूत अधिकारात जो फेरफार संसदेने केला तो घटनाबाहय किंवा घटनाविरोधी म्हणून रद्दबातल करण्याचा न्यायालयास अधिकार आहे काय? असा प्रश्न उपस्थित झाला. गोपालन् विरूध्द मद्रास राज्य या खटल्यापासून वादाला सुरूवात झाली. संसदेच्या सार्वभौमत्वास कात्री लावण्याची सत्ता न्यायालयास असू शकत नाही अशी भूमिका संसद व कार्यपालिकेने घेतली. शेवटी न्यायालयाने संसदेच राज्यघटनेत दुरूस्ती करण्याचा अधिकार मान्य केला. हीच स्थिती पुढे तब्बल सतरा वर्शे कायम राहीली. आपल्या न्यायिक पुनर्विलोकनाच्या मर्यादा मान्य करून न्यायालयाने संसदेचे श्रेश्ठतव अप्रत्यक्षरित्या मान्यच केले. संसदेने कायदा करावा, मूलभूत अधिकारांचा संकोच होतो म्हणून न्यायालयाने ती घटनादुरूस्ती घटनाबाहय म्हणून घोशित करावी तर त्याला प्रतिउत्तर म्हणून संसदेने पुन्हा घटनादुरूस्ती करून सबंधित घटनादुरूस्ती न्यायालयीन अधिकार क्षेत्राच्या बाहेर ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न करावा असे सतत तीन वेळा घडले.

1967 साली मात्र न्यायालयाने उलट भूमिका घेतली. 'गोलखनाथ विरूध्द पंजाब राज्य' या खटल्याचा निर्णय देताना न्यायालयाने असे स्पश्ट केले की, मूलभूत अधिकारांचा संकोच करणारी घटनादुरूस्ती करण्याचा अधिकार संसदेला नाही. या निर्णयामुळे संसदेच्या सर्वश्रेश्ठत्वाला आव्हान मिळाले. 1971 पर्यंत ही स्थिती कायम होती. बॅकांचे राश्ट्रीयीकरण व संस्थानिकांचे तनखेबंदी विधेयक या दोन्ही घटनादुरूस्त्या सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाहय म्हणून रद्दबातल ठरविल्या. तेव्हा 2/3 बहुमत असलेल्या नवनिर्वाचित संसदेने 1971 साली राज्यघटनेत चोवीसावी व पंचविसावी दुरूस्ती करून न्यायालयाचे पुनर्विलोकनाचे अधिकार सीमित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला व लोकनियुक्त संसद मूलभूत अधिकारासह राज्यघटनेतील कोणत्याही भागाची दुरूस्ती करू शकते हे जाहीरच करून टाकले.

घटना समितीत भाशण करताना पं. नेहरूंनी स्पश्टपणे बजावले होते की, जनतेची सार्वभौम इच्छा संसदेमार्फत व्यक्त होत असते. परिणामी कोणतेही न्यायालय अशा इच्छेच्या इश्टा निश्टतेबद्दल निर्णय देऊ शकत नाही. कोणताही न्यायाधीश किंवा कोणतेही न्यायालय भारतीय संसदेचे तिसरे सभागृह बनू शकत नाही. मात्र राज्यघटनेचा संरक्षक म्हणून संसदेने पारित केलेल्या कायद्याची, अध्यादेशाची घटनात्मक वैधता अथवा सुसंगती तपासण्याचा आपला अधिकार निरंकुश आहे यावर सर्वोच्च न्यायालय ठाम आहे. म्हणून जेव्हा देशातील नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा प्रश्न जेथे उपस्थित होईल तिथे न्यायालयाचा निर्णय अंतिम मानला पाहिजे.

सारांश :—

जगातील सर्वात मोठया संवैधानिक लोकशाही राश्ट्रामध्ये भारतामध्ये सर्वात जास्त सामर्थ्यशाली कार्यकारी मंडळाशी — एक्झिक्युटिव्हशी संलग्न संस्था आणि अलेक्झांडर हॅमिल्टन म्हटल्याप्रमाणे सर्वात दुर्बल आणि कमीत कमी धोकादायक न्यायालय यंत्रणाशी संबंधित संस्था मध्ये एकमेकांसमोर उभे ठाकण्याची संभाव्यता वा शक्यता नजीकच्या काळत येऊ घातली आहे असं दिसतयं. अलिकडील गोपाल सुब्रमण्यमच्या



Scanned by CamScanner

केसमध्ये सरकारचे कार्यकारी मंडळच नव्हे तर न्यायालयंत्रणासुध्दा न्यायालयाच्या स्वातंत्र्याच्या संवैधानिक तत्वाचा अनादर करते आहे असे दिसते.

संविधानातील एक मूलभूत खासियत म्हणून न्यायप्रक्रियेतील संस्थांचे स्वातंत्र्यही आहे. न्यायप्रक्रियेच्या स्वातंत्र्याचे महत्व पुन्हा नीट समजून घेणे आवश्यकच आहे. बहुतेक सर्व उदारमतवादी, लोकशाहीवादी राष्ट्रामध्ये आहे त्याप्रमाणे देशामध्ये जर काही तंटयाचा प्रश्न कोणी उपस्थित केलाच तर कार्यकारी मंडळच खटल्यातला सर्वात मोठा पक्षकार असतो. जर कार्यकारी मंडळ न्याय द्यायला तयार नसेल किंवा देऊ शकत नसेल तर सामान्य माणूस स्वतःला न्यायालयाच्या पायाशी लोटांगण घालतो तेव्हा अपेक्षा अशी असते की कुठल्याही प्रकारची भीती न बाळगता किंवा कुणावरही उपकार करण्यासाठी पक्षपात न करता, प्रेम वा द्वेश कुणाच्याही बाबतीत न ठेवता, त्यातली निःपक्षपाती, स्वतंत्रता सर्वांच्या मनावर ठसेल. कार्यकारी मंडळाशी कोणत्याही प्रकारचा संबंध असल्याची शंका जरी कुणाच्या मनात आली तर न्यायप्रक्रियेचा गाभाच नासून जाईल. आमच्या न्यायदानयंत्रणेच्या तळाशी याच दगडाचा आधार आहे. निःपक्षपातीपण हाच तर स्वातंत्र्य गाभा आहे. ही गोश्ट लक्षात घ्यायला हवी.

## संदर्भ –


1. एरंडे वि.ल. ( 2000) : " भारतीय लोकशाही अपेक्षा आणि वास्तव", निर्मल प्रकाशन , नांदेड.
2. पेशवे व्ही. एम. ( 1966) : "आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकारांची अंमलबजावणी" ,पेशवे प्रकाशन , यवतमाळ.
3. गोडबोले एम, गोडबोले एस. ( 2012) : "भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा", राजहंस प्रकाशन, पुणे.
4. परिवर्तनाचा वाटसरू , (पाक्षिक) : 16 ते 31 जुलै 2014.




Scanned by CamScanner